कीडनियंत्रण

# वांग्यावरील फळे आणि शेंडे पोखरणाऱ्या अळीला अटकाव



**डॉ. पंकजकुमार पाटील**
(मो.नं. ७५८८९२११९६)
अकोला





पीक फुलोऱ्यावर यायच्या अगोदर एकरी ४ ते ६ कामगंध सापळे लावावेत. सापळे शेतात पिकाच्या उंचीच्या वर लावावेत. यातील कामगंध किडीचा नर पतंगांना आकर्षित करून जायबंदी करतो. त्यामुळे त्यांचे मिलन होत नाही. मिलनामध्ये अडथळा येतो. त्यामुळे प्रजननक्षमता निरस्त्र झाल्याने वांग्यावरील कीड मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येते.

**वां**गे पिकावर शेंडे तसेच फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होतो. या अळीचा बंदोबस्त कसा करावा, याची माहिती या लेखात दिली आहे.

**किडीची ओळख :** या किडींचे पतंग पांढरे असून त्यावर गुलाबी व पिंगट ठिपके असतात. तर अळ्या गुलाबी रंगाच्या असतात. वर्षाकाठी किडीच्या आठ ते दहा पिढ्या पूर्ण होतात. फळ आणि शेंडा पोखरणारी कीड सर्वसाधारणपणे ४० टक्के नुकसान करते. जर दुर्लक्ष केले व योग्य वेळी उपाययोजना केल्या नाहीत तर हे नुकसान ८० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते.

**नुकसानीचा प्रकार :** शेंडा आणि फळे पोखरणारी अळी पानांच्या देठात, कोवळ्या शेंड्यांत, फुलांत किंवा फळांत शिरून उपजीविका करते. अंड्यातून बाहेर



पडल्यानंतर अळी पानाच्या मुख्य शिरेतून देठात आणि त्यानंतर शेंड्यात प्रवेश करते. अळीने शेंडा आतून पूर्णपणे पोखरल्याने कीडग्रस्त शेंडे सुकून वाळलेले दिसतात. पीक फुलोऱ्यावर आल्यानंतर अळी कळी पोखरून आत शिरते. प्रादुर्भावग्रस्त फुले फळ न धरता वाळून, सुकून जमिनीवर गळून पडतात.

लहान फळामध्ये ही अळी हिरव्या पाकळीच्या आतून फळामध्ये प्रवेश करून, विष्ठेद्वारे प्रवेशद्वार बंद करते. त्यामुळे बाहेरून फळ किडले आहे की नाही हे कळणे अवघड असते. अळी फळात शिरल्यावर आतील गर खाते. विष्ठा आतच सोडते. अशी कीडग्रस्त फळे खाण्यास अयोग्य ठरतात. किडीमुळे ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. किडीच्या नियंत्रणाकडे दुर्लक्ष केल्यास हेच नुकसान ७० ते ८० टक्क्यांपर्यंत झाल्याचे आढळले आहे.

**आर्थिक नुकसान पातळी :** ५ टक्के शेंड्यांचे किंवा फळाचे नुकसान

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

* पीक लागवडीपूर्वी शेताची खोल नांगरट करावी.
* या किडीस कमी बळी पडणाऱ्या तथा प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी.
* लागवडीच्या अगोदर रोपांची मुळे इमिडाक्लोप्रिड १ मि.लि. या प्रमाणात प्रतिलिटर पाण्याच्या द्रावणात २-३ तासांसाठी बुडवून ठेवावीत.
* किडग्रस्त शेंडे व फळे आढळून आल्यास काढून नष्ट करावीत.
* पीक फुलोऱ्यावर यायच्या अगोदर एकरी ४ ते ६ कामगंध सापळे लावावेत. सापळे शेतात पिकाच्या उंचीच्या वर लावावेत. यातील कामगंध किडीचा नर पतंगांना आकर्षित करून जायबंदी करतो. त्यामुळे त्यांचे मिलन होत नाही. मिलनामध्ये अडथळा येतो. त्यामुळे प्रजननक्षमता निरस्त्र झाल्याने वांग्यावरील कीड मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येते.
* जैविक कीड नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस प्रजातीचे ट्रायकोकार्ड ४-५ प्रतिहेक्टरी लावावेत.
* निंबोळी अर्क ५ टक्के किंवा बी.टी. जिवाणू १०० ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारावे.
* अझाडीरेक्टिन ०.०३ टक्के ३ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात लागवडीनंतर १५ दिवसांनी फवारणी करावी.
* सिंथेटिक पायरिथ्रोईड्स या वर्गातील कीटकनाशकांचा वापर टाळावा.
* या अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ असल्यास क्लोरोपायरिफॉस २० इसी १० मि.लि. किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५ एस.जी. ४ ग्रॅम किंवा लॅमडा- सिहॅलोथ्रिन ४.९ सी.एस. १० मि.लि. किंवा पायरिप्रोक्झिफेन ५ इ.सी. + फेनप्रोपाथ्रिन १५ इ.सी. १० ते १२ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
* या अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेल्यास नियंत्रणासाठी थायक्लोप्रिड २१.७ एस.सी. १.५ मि.लि. किंवा थायोडिकार्ब ७५ डब्लू.पी. १० ते २० ग्रॅम किंवा क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एससी. ४ मि.लि. किंवा बिटा सायफ्लुथ्रिन ८.४९ + इमिडोक्लोप्रिड १९.८१ ओडी १५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

टीप : (वरील कीटकनाशके तोडणी सुरू व्हायच्या ५-६ दिवस अगोदर वापरू नयेत). ■